राज्यातील १४ नगरपंचायतींमधील
२५ रिक्त सदस्य पदांच्या पोट
निवडणुकांसाठी मतदार यादीचा
कार्यक्रम-२०२६.

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्र. रानिआ/नप-२०२६/प्र.क्र.१/का-६,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
ईमेल- sec.council@mah.gov.in
दिनांक : ११/०२/२०२६

निवडणूक तात्काळ
ई-मेलद्वारे

प्रति,

जिल्हाधिकारी (सर्व).
(मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा वगळून).

विषय:- राज्यातील १० जिल्हयातील १४ नगरपंचायतींमधील २५ सदस्य रिक्त पदांच्या पोट निवडणुकांसाठी मतदार यादीचा कार्यक्रम-२०२६.

संदर्भ:- १. मा.सर्वोच्च न्यायालयाने पिटीशन फॉर स्पेशल लिव्ह टू अपिल(सी) क्र.१९७५६/ २०२१ व इतर संलग्न याचिकांमध्ये दि.०६/०५/२०२५ व दि.१६/०९/२०२५ रोजी झालेला निर्णय

२. राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक-रानिआ/ग्रापंनि-२०२३/प्र.क्र.०३/ का-८, दि.१६/०७/२०२५ व दि.२९/१०/२०२५

३. राज्य निवडणूक आयोगाची क्रमांक-रानिआ/जिपपंस-२०२५/प्र.क्र.२०/ का-०७, दि.२१/०८/२०२५ रोजीची अधिसूचना

महोदय/महोदया,

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पर्यवेक्षण, संचालन व नियंत्रण याची सर्व जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे. त्याअनुषंगाने परिशिष्ट-१ मध्ये नमूद केलेल्या १० जिल्हयातील १४ नगरपंचायती मधील २५ सदस्य पदांच्या पोट निवडणुका घेणे आवश्यक आहे. तसेच या व्यतीरिक्त कोणत्याही कारणाने रिक्त झालेल्या पदांचा (सहा महिने पेक्षा जास्त कालावधी असलेल्या) नगरपंचायती यांच्या ही जागांचा समावेश करण्यात यावा.

२.  स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी राज्य निवडणूक आयोग स्वतंत्रपणे मतदार यादी तयार करत नसून भारत निवडणूक आयोगाकडून तयार होणारी विधानसभेची मतदार यादी वापरण्यात येते. याकरिता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदानाचा संभाव्य दिनांक लक्षात घेऊन मतदार यादी तयार करण्यासाठी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ च्या कलम ११ अन्वये एक विशिष्ट दिनांक (Cut off date) अधिसूचित केला जातो.

३.  ज्याअर्थी, महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम ११ नुसार विधानसभेची मतदार यादी नगरपंचायतींच्या प्रभागानुसार विभागून ती सार्वत्रिक निवडणुकीकरिता तयार करणे व अधिकाऱ्यांनी अधिसूचित करणे, या प्रयोजनासाठी दि.०१/०७/२०२५ हा दिनांक संदर्भांकित क्र.३ नुसार अधिसूचित केला आहे (प्रत संलग्न). या विशिष्ट दिनांकास अस्तित्वात असलेली महाराष्ट्र विधानसभेच्या मतदार यादीचे प्रभागनिहाय विभाजन करुन वरील निवडणुकांसाठी वापरण्यात येईल.

४.  त्याअर्थी, दिनांक ०१/०७/२०२५ रोजी अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीचे नगरपंचायतींसाठी प्रभागनिहाय विभाजनासाठी खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत:-

## आदेश

५.  मतदार यादीच्या कार्यक्रमाची व्याप्ती :-

राज्य निवडणूक आयोगाने दि.२१/०८/२०२५ च्या अधिसूचनेन्वये दिनांक ०१/०७/२०२५ ही Cut-off date जाहीर केला असून, त्या दिवशी (म्हणजेच दि.०१/०७/२०२५ रोजी) अस्तित्वात असलेली महाराष्ट्र विधानसभेची मतदार यादी या पोट निवडणुकांसाठी वापरण्यात येईल. या मतदार यादीच्या आधारे प्रभागनिहाय मतदारांचे विभाजन करण्याची कार्यवाही करण्यात यावी. याकरिता राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिंआ/ग्रापंनि-२०२३/प्र.क्र.०३/का-८, दि.१६/०७/२०२५ व दि.२९/१०/२०२५ मध्ये दिलेल्या सूचनांनुसार कार्यवाही करावी.

६.  वरील मतदार यादी ग्राह्य धरुन उपरोक्त नगरपंचायतींच्या पोट निवडणुकांसाठी मतदार यादीचा कार्यक्रम खालील प्रमाणे राहील :-

(i) प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करणे : २०/०२/२०२६(शुक्रवार)

| | | |
|---|---|---|
| (ii) | प्रारुप मतदार यादीवर हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी | : २०/०२/२०२६(शुक्रवार)<br>ते<br>२७/०२/२०२६(शुक्रवार) |
| (iii) | अंतिम प्रभागनिहाय मतदार याद्या अधिप्रमाणित करुन प्रसिध्द करणे. | : ०६/०३/२०२६(शुक्रवार) |

७. प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादी तयार करणे :-

७.१ संबंधित मुख्याधिकारी यांनी विधानसभेच्या मतदार याद्यांचे खालील बाबींचा विचार करुन संगणकीकृत पध्दतीने प्रभागनिहाय विभाजन करावे. असे करतांना

I. सोबतच्या परिशिष्ट-१ मध्ये नमूद नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता आयोगाकडून विकसीत करण्यात . आलेले सॉफ्टवेअरचे (URL-https://mahasecvoterlist.in) उपयोग करून संगणकप्रणालीद्वारे मतदार यादी तयार करण्याकरिता संगणकीकरण कक्षाकडून यूजर आयडी व पासवर्ड देण्यात येतील.

II. यूजर आयडी पासवर्ड प्राप्त झाल्यानंतर Election Assembly Master, Ward Master भरण्यात यावे व कंट्रोल चार्ट तयार करून तो योग्य असल्याची खात्री करावी व तो योग्य असल्याची खात्री करून संगणकप्रणालीमधून मतदार यादीच्या PDF तयार करून घ्याव्यात.

७.२ प्रारुप प्रभागनिहाय मतदार यादी तयार करताना पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी:-

अ) विधानसभा मतदार यादीत संबंधित नगरपंचायतींच्या हद्दीत समाविष्ट असलेल्या एकूण मतदारांची संख्या आणि नगरपंचायतींसाठी तयार केलेल्या प्रभाग निहाय प्रारुप मतदार यादीतील मतदारांची एकुण संख्या समान असणे आवश्यक आहे. म्हणजेच संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या संबंधीत प्रभागातील सर्व मतदार, प्रारुप मतदार यादीत समाविष्ट करण्यात आले आहेत. तसेच संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अथवा प्रभागाच्या हद्दीबाहेरील मतदार, त्यामध्ये समाविष्ट झाले नाहीत याची खात्री करावी.

ब) या मतदार यादीतील दुबार नावांबाबत, मयत अथवा स्थलांतरित मतदारांच्या बाबतीत आयोगाच्या आदेश क्र.रानिआ/ग्रापंनि-२०२३/प्र.क्र.३/का-८, दि.१६/०७/२०२५ व दि.२९/१०/२०२५ अन्वये कार्यवाही करावी.

क) विधानसभेसाठी तयार करण्यात आलेल्या मतदार यादीमध्ये बदल करण्याचे जसे की, नवीन नावांचा समावेश करणे, नाव वगळणे, नावातील दुरुस्ती व पत्त्यामधील दुरुस्ती करणे इत्यादीबाबतची कार्यवाही राज्य निवडणूक आयोगाकडून केली जात नाही. (आयोगाचे क्र.रानिआ-ग्रापनि२०२३/प्र.क्र.०३/का-८, दि.१६ जुलै, २०२५ व दि.२९/१०/२०२५ चे आदेश)

७.३ संगणकीकृत पध्दतीने परिशिष्ट-१ मध्ये नमूद केलेल्या नगरपंचायतींच्या पोट निवडणुकांकरिता प्रभागनिहाय मतदार यादीचे विभाजन करावे.

८. प्रारुप प्रभागनिहाय मतदार यादी प्रसिध्द करणे :-

प्रारुप प्रभागनिहाय मतदार यादीवर नागरिकांकडून हरकती व सूचना मागविण्यासाठी, प्रारुप मतदार यादीला संबंधित मुख्याधिकारी यांनी व्यापक प्रसिध्दी द्यावी. (परिच्छेद ११ प्रमाणे)

९. प्राप्त झालेल्या हरकती व सूचना विचारात घेऊन संबंधीत मुख्याधिकारी यांनी प्रभागनिहाय व मतदान केंद्रनिहाय मतदार यादी अंतिम करणे :-

९.१ संबंधित जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने दि.२०/०२/२०२६ ते दि.२७/०२/२०२६ पर्यंत प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर नियमाप्रमाणे विचार करुन प्रभागनिहाय मतदार यादी अंतिम करावी. प्राप्त होणाऱ्या हरकती व सूचनांवर फक्त खालीलप्रमाणे सुधारणा / दुरुस्ती करता येईल.

i. लेखनिकांच्या काही चुका.
ii. दुसऱ्या प्रभागातील मतदार चुकून अंतर्भूत झालेले.
iii. संबंधित प्रभागातील विधानसभा मतदार यादीत मतदारांची नावे असूनही नगरपंचायतींच्या संबंधित प्रभागाच्या मतदार यादीमध्ये नावे वगळण्यात आली असल्यास अशा मतदारांची नावे मतदार यादीत समाविष्ट करणे.
iv. मृत व्यक्तींची नावे आढळल्यास किंवा त्याबाबत हरकती किंवा सूचना प्राप्त झाल्यास त्याची नोंद मार्ककॉपी मध्ये घेणे

९.२ विहित मुदतीत प्राप्त होणाऱ्या सर्व हरकती व सूचनांवर संबंधीत जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने निर्णय घेऊन आवश्यक असल्यास योग्य त्या सुधारणा मतदार यादीत कराव्यात.

१०. संबंधीत मुख्याधिकारी यांनी अंतिम मतदार याद्या अधिनियमातील तरतुदीनुसार अधिप्रमाणित करुन त्याबाबतची सूचना विहित तारखेस प्रसिध्द करण्यात यावी. (परिच्छेद ११ प्रमाणे)

११. प्रारुप व अंतिम प्रभागनिहाय मतदार यादीस मुख्याधिकारी यांनी खालीलप्रमाणे व्यापक प्रसिध्दी द्यावी जसे:-

(i) नगरपंचायतींचे मुख्य कार्यालय, प्रभाग समितीचे कार्यालय व इतर कार्यालयातील सूचनाफलक.

(ii) स्थानिक वृत्तपत्र

(iii) नगरपंचायतींच्या तहसील कार्यालयाचे सूचना फलक.

(iv) स्थानिक केबल टि.व्ही.

(v) जिल्हाधिकारी व नगर पंचायत यांचे संकेतस्थळ, इत्यादी.

१२. मतदार यादीचा कार्यक्रम सुरु झाल्यानंतर एखाद्या नगरपंचायतीच्या पोट निवडणुकीबाबत न्यायालयाचे / शासनाचे स्थगिती आदेश प्राप्त झाल्यास सदर मतदार यादीचा कार्यक्रम रद्द करुन त्याबाबतचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने आयोगास तात्काळ सादर करावा.

१३. वरील सूचनांप्रमाणे आयोगाने अधिसूचित केलेल्या दिनांकास अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीचे विभाजन विहित मुदतीत व बिनचूक करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी व मुख्याधिकारी यांची राहील.

१४. मतदार यादीचा कार्यक्रम आयोगाच्या https://mahasec.maharashtra.gov.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(के. सुर्यकृष्णमूर्ती)
उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

सहपत्र- परिशिष्ट- १

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी:-

१. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
२. प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.

४. संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
५. प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन तथा विभागीय आयुक्त, सर्व
६. सहायक आयुक्त (जनसंपर्क), राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
७. संबंधीत नगरपंचायतींचे मुख्याधिकारी
८. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
९. राज्य निवडणूक आयोगाचे मुंबई उच्च न्यायालयाच्या तिन्ही खंडपीठांमध्ये नेमलेले वकील.
१०. निवड नस्ती (का-६), राज्य निवडणूक आयोग, मुंबई.

# नगरपंचायत रिक्त पदांची माहिती

## परिशिष्ट-१

| अ.क्र. | जिल्हा | नगरपंचायतीचे नाव | सदस्याचे नाव | प्रभाग क्रमांक | रिक्त जागेचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | रायगड | पाली | विनायक विठ्ठल जाधव | १३ | सर्वसाधारण |
| | | पाली | प्रणाली निशिकांत पाटील | १४ | सर्वसाधारण महिला |
| | | पाली | सचिन सुधाकर जवके | ९ | सर्वसाधारण |
| | | पोलादपूर | सुनिता ज्ञानदेव पार्टे | १ | सर्वसाधारण महिला |
| २ | नाशिक | देवळा | श्री. अशोक संतोष आहेर | १३ | सर्वसाधारण |
| | | पेठ | श्रीमती अलका रविंद्र कस्तुरे | १६ | सर्वसाधारण महिला |
| ३ | सोलापूर | माळशिरस | रेशमा सूर्यकांत टेळे | ११ | ना.मा.प्र. (महिला) |
| ४ | जालना | घनसांगवी | श्रीमती गायकवाड शोभाबाई दादाराव | १२ | अ.जा. (महिला) |
| | | तिर्थपुरी | श्रीमती सुमनबाई कुंडलिकराव कासार | १२ | अ.जा. (महिला) |
| ५ | वाशिम | मनोरा | श्री शाह निसार शहा जब्बार शहा | १४ | सर्वसाधारण |
| ६ | नागपूर | हिंगणा | श्री. अजय शेषरावजी बुढे | १० | अहवाल अप्राप्त |
| ७ | वर्धा | समुद्रपूर | म्हैस्के कचरू परसराम | १६ | अनुसूचित जाती |
| ८ | चंद्रपूर | जिवती | सौ. विजयलक्षी जवालसिंग राठोड | ७ | सर्वसाधारण (महिला) |
| ९ | गोंदिया | सडक अर्जुनी | श्री. अनिल लक्ष्मण राजगिरे | ११ | अहवाल अप्राप्त |
| १० | गडचिरोली | कुरखेडा | गौरी मंन्साराम उईके | १६ | अनुसूचित जमाती (महिला) |
| | | अहेरी | कुमारी रोजा शंकर करपेत | १६ | अनुसूचित जाती (महिला) |
| | | अहेरी | शैलेंद्र मोहनराव पटवर्धन | ५ | सर्वसाधारण |
| | | अहेरी | विलास बुधाजी सिडाम | २ | अनुसूचित जमाती |
| | | अहेरी | ज्योती नरेंद्र सडमेक | ४ | अनुसूचित जमाती (महिला) |
| | | अहेरी | सुरेखा विलास गोडसेलवार | १० | सर्वसाधारण |
| | | अहेरी | नौरास रियाज मोहम्मद शेख | १२ | सर्वसाधारण महिला |
| | | अहेरी | मीना माणिक ओंडरे | १३ | अनुसूचित जाती (महिला) |
| | | अहेरी | महेश मलय्या वाकेवर | १४ | सर्वसाधारण |
| | | अहेरी | सुनिता किशोर मंथनवार | ९ | अनुसूचित जमाती (महिला) |
| | | अहेरी | विलास लक्ष्मण गलबले | १७ | अनुसूचित जाती |
| | १० | १४ | एकूण रिक्त पदांची संख्या - २५ | | |